पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/१०/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/१०/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.जावेद रमजान शेख
३. मा.ननवरे जितेंद्र बाबा
४. मा.जगदीश शेट्टी
५. मा.अड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
७. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.इंदलकर – प्र.सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उबाळे – प्रशासन अधिकारी ( शिक्षण मंडळ), मा.ओंबासे – कार्यकारी अभियंता, मा.भोसले – प्र.कार्यकारी अभियंता, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड मनपा ३३ वा वर्धापनदिन २०१५ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत...

विषय क्र.१०) व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.संगीता पवार, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५ व १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १५/०७/२०१५ व १७/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.२०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ०४ | विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०७/१०/२०१५ | विभाग – क्रीडा
सुचक : मा.जितेंद्र ननवरे | अनुमोदक : मा.जगदीश शेट्टी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०६/कावि/२२१/२०१५, दि.१५/०४/२०१५

विषय - म.न.पा.चा इंद्रायणीनगर से.नं.०१ भोसरी येथील बॅडमिंटन हॉल राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र, पुणे ०६ यांना ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०५ | विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०७/१०/२०१५ | विभाग – क्रीडा
सुचक : मा.जावेद शेख | अनुमोदक : मा.जगदीश शेट्टी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०८/कावि/७८/२०१५, दि.१७/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कु.निशा राजकिशोर चिंतोळे, चिंचवड, पुणे हिची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये व्हॉलीबॉल या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी क्रीडा धोरणानुसार कु.निशा राजकिशोर चिंतोळे यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०६ | विषय क्रमांक - ०३
दिनांक - ०७/१०/२०१५ | विभाग – क्रीडा
सुचक : मा.जावेद शेख | अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५२४/२०१५, दि.२३/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांचे मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०१९ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१५ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड मनपाचे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१४ ( पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस येणा-या अंदाजे र.रु. ३,४१,८४०/-

इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,७१,८४०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरीता चहापान व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.जगदीश शेट्टी अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७९/२०१५, दि.१७/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कु.वर्षा रमेश नागराळ, निगडी, पुणे ४४ हिची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये व्हॉलीबॉल या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी त्यांना क्रीडा धोरणानुसार वर्षा रमेश नागराळ यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/-( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.जगदीश शेट्टी अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/८०/२०१५, दि.१७/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कुमार भरत लहु पाटील, भोसरी, पुणे ३९ याची Special Olympic world Games, Los Angeles 2015 मध्ये सायकलिंग या खेळाच्या स्पर्धेसाठी निवड झाली असून सदर स्पर्धा दि.२४/०७/२०१५ ते ०२/०८/२०१५ या काळात लॉस अँजेलीस, कॅलीफोर्निया, यु.एस.ए. येथे उपस्थित राहणेकामी त्यांना क्रीडा धोरणानुसार भरत लहु पाटील, भोसरी, पुणे ३९ यांचे नावे आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक लाख फक्त ) अदा करणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.नितीन लांडगे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५८४/२०१५, दि.०७/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहापान अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी, कोटेशन/ निविदा पध्दतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा चहापान, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ. सन २०१५-१६ मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी मनपा शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवासखर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.१३,१४,५००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा निधी वार्षिक क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी/विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालय / उद्यान (स्थापत्य) मार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग संबंधीत क्षेत्रीय कार्यालये यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.जगदीश शेट्टी अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३४५/२०१५, दि.१३/०८/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १२०६, दि.२०/१०/२०११ व आदेश क्र.क्रीडा /७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे क्रीडाधोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग दोन वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापिठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१२-१३ व २०१३-१४ चे लाभार्थी ६२ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधित क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता २४ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा अहवाल दिलेला आहे. प्रस्तावात नमुद २४ पात्र खेळाडूंना दत्तक योजना २०१५-१६ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.३३,००,०००/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस

करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०८

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.जगदीश शेट्टी अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६७१/२०१५, दि.१५/०९/२०१५

विषय - महापौर चषक क्रीडा स्पर्धेस मा.माजी महापौर यांचे नाव देणेस मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक ०८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेली विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०९

दिनांक - ०७/१०/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा. जगदीश शेट्टी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९७/२०१५, दि.०१/१०/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा ३३ वा वर्धापन दिन २०१५ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धेतील विजेत्या / उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, स्मृती चिन्हे खरेदी, कॅप, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा प्रसंगी अधिकारी पाहुणे, कर्मचारी यांना चहापान व अल्पोपहार, क्रिकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन इ.कामी येणा-या अंदाजे र.रु.३,३२,६२०/- (अक्षरी र.रु.तीन लाख बत्तीस हजार सहाशे वीस फक्त) चे खर्चास् मान्यता व स्पर्धेतील विजेत्या / उपविजेत्या खेळाडूंना बक्षिस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, स्मृती चिन्हे खरेदी, कॅप, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, क्रीडा साहित्य इ.ची खरेदी, कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस, सदरचा खर्च क्रीडा निधी, मनपातर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर केलेल्या तरतुद र.रु.५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - १०

दिनांक - ०७/१०/२०१५

सुचक : मा.संगीता पवार अनुमोदक : मा.जावेद शेख

संदर्भ : मा.संगीता पवार, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.११ सेक्टर नं.२२ मधील कै.मधुकर पवळे व्यायामशाळा मनपाच्या नियमानुसार ११ महिने कालावधीसाठी जय भवानी मित्र मंडळ यांस चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७१५/२०१५
दिनांक : ०७/१०/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.